**ठळक बातम्या**

- नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमधल्या २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी वेगळं प्राधिकरण स्थापन करण्याची मुख्यमंत्र्यांची सूचना

- बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगच्या सरपंचांच्या हत्येप्रकरणी विशेष सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नियुक्ती

- महाशिवरात्रीच्या सणाचा राज्यात सर्वत्र उत्साह/ शिवमंदिरांमधे अलोट गर्दी

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दानिश मालेवार आणि करूण नायरनं सावरला विदर्भाचा डाव

**<><><><><>**

नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी वेगळे कुंभमेळा प्राधिकरण निर्माण करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत आढावा बैठकीत दिल्या. तसेच हा सिंहस्थ कुंभ ‘डिजिटल टेक्नॉलॉजी कुंभ’ म्हणून ओळखला जावा, यासाठीचे नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन सुव्यवस्थित व्हावे, सर्व यंत्रणांचा समन्वय व्हावा, कुंभमेळ्याची कामे गतीने व्हावीत, यासाठी कुंभमेळा प्राधिकरण तयार करावे. त्यासाठी कुंभमेळा प्राधिकरण कायदा तयार करुन कुंभमेळ्यासाठी लागणारे मनुष्यबळ कुंभमेळा प्राधिकरणाच्या अखत्यारित घ्यावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिल्या.

प्रयागराजमधली गर्दी पाहता नाशिकमधल्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी आणखी चार ते पाच पट गर्दीच्या अनुषंगाने जास्तीचे नियोजन करण्याचे निर्देशही

त्यांनी दिले. गर्दीचे व्यवस्थापन, घाटांची संख्या, रस्ते, रेल्वे आणि हवाई वाहतुकीचे नियोजनही कुंभमेळा आराखड्यात असावे. नाशिक-त्र्यंबक दरम्यानचा रस्ता विस्तारित करावा. या रस्त्यांच्या कडेला टेंट सिटी उभारण्यासंदर्भातही विचार करावा, असेही ते म्हणाले. नाशिककडे येणाऱ्या मार्गांची क्षमता वाढवावी. शिर्डी, छत्रपती संभाजी नगर, ओझर या विमानतळावर अधिक विमानं उतरवण्यासाठी प्रयत्न करावे. रेल्वेने येणाऱ्या भाविकांसाठी नाशिक रोड, इगतपुरी, कसारा आदी स्थानकांमध्ये सोयी सुविधा निर्माण कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

**<><><><><>**

पुण्यात स्वारगेट बस स्थानकात एका बसमध्ये काही दिवसांपूर्वी पहाटे एका तरुणीवर बलात्कार झाला. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीच्या शोधासाठी विविध ठिकाणी पथकं रवाना केली आहेत. याप्रकरणी आरोपीवर कठोर कारवाई करण्याची सूचना राज्य सरकारनं पोलिसांना केली आहे.

याप्रकरणी स्थानक प्रमुख आणि आगार व्यवस्थापकांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. सुरक्षा रक्षक बदलण्याचे आदेश त्यांनी दिले.

महिला प्रवाशांच्या सुरक्षेसंदर्भात उद्या मंत्रालयात बैठक होणार आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी राज्य सरकारनं ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे. तर, विधीज्ञ बाळासाहेब कोल्हे यांची सहाय्यक विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे.

**<><><><><>**

महाशिवरात्री निमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२६ फेब्रुवारी २०२५ बुधवार

**होल्ड - व्हाइस कास्ट**

*देशातल्या १२ ज्योतिर्लिंगांपैकी पुण्यातलं भीमाशंकर, नाशिकमधलं त्र्यंबकेश्वर, वेरुळचं घृष्णेश्वर, हिंगोलीमधलं औंढा नागनाथ आणि बीड जिल्ह्यातल्या परळी इथलं वैजनाथ अशी ५ ज्योतिर्लिंग महाराष्ट्रात आहेत. महाशिवरात्रीनिमित्त सर्व मंदिरे आकर्षक रोषणाई आणि फुलांच्या सजावटीनं सजली असून भजन, कीर्तन, पूजा, महाअभिषेक असे आयोजित केले आहेत. राज्यात सर्व शिवालयांमध्ये दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली आहे.*

*नाशिकच्या त्रंबकेश्वर महादेव मंदिरात दर्शनासाठी राज्यभरातून भाविक दाखल झाले आहेत. आज सकाळी त्र्यंबकेश्वराची महापूजा करण्यात आली.*

*बीड जिल्ह्यातल्या परळी वैजनाथ इथल्या प्रभु वैद्यनाथाच्या महाशिवरात्र यात्रा महोत्सवाची सुरुवात झाली. काल मध्यरात्री पासून जवळपास ५ लाखांच्यावर भाविकांनी वैद्यनाथाचे दर्शन घेतलं आहे.*

*मुंबईच्या बाबुलनाथ सह प्रसिद्ध शिवमंदिरांमध्ये दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी आहे.*

*रत्नागिरी जिल्ह्यात महाशिवरात्रीचा उत्साह असून जिल्ह्यात ठिकठिकाणी शिवमंदिरांमध्ये धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.*

*नांदेडमध्ये शिव मंदिरामध्ये पहाटेपासून अभिषेक, पूजाअर्चना केली जात आहे.*

*लातूरचे ग्रामदैवत असलेल्या सिद्धेश्वर आणि रत्नेश्वर देवस्थानच्या महाशिवरात्री यात्रेला सुरुवात झाली. हा उत्सव २१ दिवस चालणार आहे.*

*धुळे जिल्ह्यातल्या महादेव मंदिरांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलं आहे.*

*गडचिरोलीतल्या मार्कंडेश्वर इथं आज हजारो भाविकांनी शिवलिंगाचे दर्शन घेऊन वैनगंगा नदीत स्नान केलं.*

*आरमोरी तालुक्यातल्या वैरागड भंडारेश्वर, कुरखेडा तालुक्यात अरततोंडी आणि खोब्रामेंढा तसंच चामोर्शी तालुक्यात चपराळा मंदिरात जाऊन भाविकांनी शिवलिंगाचे दर्शन घेतलं.*

*परभणी जिल्ह्यात गंगाखेड तालुक्यात धारसुर इथं, एरंडेश्वर येथील सिद्धेश्वर मंदिरात तर परभणीतल्या पारदेश्वर मंदिरात विधिवत पूजा करण्यात आली.*

*भंडारा जिल्ह्यात तुमसर तालुक्यात गायमुख इथं महाशिवरात्री निमित्त भव्य यात्रेचं आयोजन करण्यात आलं.*

**<><><><><>**

महाशिवरात्रीच्या निमित्तानं गोंदिया जिल्ह्यात अर्जुनी मोरगाव तालुक्यातल्या प्रतापगड किल्ल्यावर भव्य यात्रा भरली आहे. हिंदु - मुस्लीम समाजातल्या एकतेचं प्रतिक ठरलेल्या या यात्रेत लाखो हिंदू आणि मुस्लिम भाविक भगवान शंकर तसंच ख्वाजा उस्मान गणी हारूनी दर्ग्यावर नतमस्तक होत आहेत. या यात्रेनिमीत्त भाविकांच्या सोयीसाठी केलेल्या उपाययोजनांविषयी जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी अधिक माहिती दिली

**होल्ड बाईट**

या यात्रेला गेल्या ३०० वर्षांची परंपरा आहे. या किल्ल्यावर एका बाजुला भगवान शंकराची अर्थात मोठा महादेवाची मुर्ती आहे,तर दुसऱ्या बाजुला दर्गा आहे. राजे रघुजी भोसले यांनी जिंकलेल्या या किल्ल्याचा कारभार राजा खान यांच्यांकडे असताना, ख्वाजा उस्मान गणी हारूनी यांचं वास्तव्य होतं, त्यांच्या निधनानंतर तिथे दर्गा बांधला गेला, तेव्हापासून या यात्रेला सुरुवात झाली. २००१ साली राज्य शासनानं या ठिकाणाला ‘क’ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा दिला होता.

**<><><><><>**

उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुणकेश्वराचं आज दर्शन घेतलं. पालकमंत्री नितेश राणे आणि मंदिर व्यवस्थापन समितीच्या वतीनं उपमुख्यमंत्री शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत आज नागपुरात सुरु झालेल्या अंतिम सामन्यात विदर्भानं पहिल्या डावात दिवसअखेर ४ बाद २५४ धावा केल्या. केरळनं नाणेफेक जिंकून विदर्भाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं, आणि अवघ्या २४ धावात विदर्भाचे आघाडीचे तीन फलंदाज तंबूत धाडले. मात्र त्यानंतर शतकवीर दानिश मालेवार आणि करूण नायर यांनी विदर्भाचा डाव सावरला. त्यांनी चौथ्या गड्यासाठी २१५ धावांची भागीदारी केली. करूण नायर ८६ धावा करुन बाद झाला. आजचा खेळ थांबला तेव्हा दानिश मालेवार १३८ धावांवर, तर यश ठाकूर ५ धावांवर खेळत होता.

केरळतर्फे एमडी निधीशनं दोन गडी बाद केले.

**<><><><><>**

रक्तदानाविषयी जनजागृती करण्यासाठी ब्लड डोनर मोटिव्हेशन कमिटीनं आज मुंबईत इस्लाम जिमखाना इथं आयोजित केलेल्या क्रिकेट स्पर्धेत जसलोक रुग्णालयाच्या संघानं विजेतेपद पटकावलं. नानावटी रुग्णालयाचा संघ उपविजेता ठरला. महिला संघामध्ये के. ई.एम. रुग्णालयाच्या संघानं विजेतेपद, तर जगजीवन रुग्णालयाच्या संघानं उपविजेतेपद पटकावलं. गेल्या ३ वर्षांपासून ही स्पर्धा सुरू आहे.

**<><><><><>**

चंद्रपूरमध्ये २ स्वतंत्र घटनांमध्ये आज ६ जणांचा बुडून मृत्यू झाला. राजुरा तालुक्यात वर्धा नदीवर आंघोळीसाठी गेलेले ३ युवक बुडाले. दुसऱ्या घटनेत

सावली तालुक्यात ३ मुली वैनगंगा नदीच्या पात्रात बुडाल्या. हे सर्वजण आंघोळीसाठी नदीत उतरले होते.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी, तर कोकणात काही ठिकाणी किमान तापमानात किंचित वाढ झाली.

राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान मुंबईत सांताक्रुझ इथं ३८ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात मुंबईसह कोकणात उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. मुंबईत कमाल तापमान ३९ अंश सेल्सिअसपर्यंत राहण्याची शक्यता मुंबईच्या प्रादेशिक हवामान शास्त्र केंद्रानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**